aglasem.com

FOR CBSE CLASS 12 PREPARATION

CBSE Class 12 Sample Paper 2027 for Marathi

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
CBSE Class 12	2027	Sample Paper	Marathi

Sample Question Paper : Marathi : 2026– 27
CLASS : XII
Subject Code : 109

नमुना प्रश्न-पत्रिका : इयत्ता बारावी : मराठी (109) : 2026- 27

वेळ : 3 तास **एकूण गुण Total Marks : 80**

सर्व साधारण सूचना :

1. या प्रश्नपत्रिकेत A, B, C, D असे चार विभाग आहेत.
2. सर्व विभाग आवश्यक आहेत.
3. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
4. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

विभाग : A: वाचन व आकलन (15)

प्रश्न 1)पुढील परिच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.(CBQ)

आपण शिक्षण पद्धतीवर मनसोक्त टीका करतो, वाचतो, ऐकतो; पण तरीही आपली सगळी तडफड त्याच शिक्षणप्रणालीतील ठराविक अभ्यासक्रम पूर्ण करणे यासाठी चालते. नंतरचे आयुष्य, त्यात सामोरी येणारी परिस्थिती आणि आपल्याला मिळणारे शिक्षण यांची सांगड खूपच कमी असते. त्यात स्वतःची आवड, क्षमता आणि विद्यापीठाचे शिक्षण यांचीही परस्परसंगत जमली नाही, तर नक्कीच आयुष्यभर पदोपदी ठेचा लागण्याचा संभव असतो.

एखादी विद्याशाखा अभ्यासाला निवडणे, त्यात पारंगत होणे आणि त्या विद्याशाखेत व्यवसाय करणे, नोकरी करणे यात खूपच फरक आहे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणचे वातावरण व परिस्थिती याचा आधी कधीच अनुभव नसतो आणि मग कामाच्या ठिकाणी कंटाळा, निराशा, न्यूनगंड जाणवू लागतो.

स्वतःच्या क्षमतांचा दहावी-बारावीत नीट अंदाज येत नाही. सभोवतालचे अभ्यासाचे वातावरण व दडपण, परीक्षेचा ठराविकपणा व त्यांना अनुसरून क्लासेसमधून मिळालेले प्रशिक्षण यांचाच आपल्या कामगिरीमध्ये जास्त वाटा असेल, तर दहावी, बारावीचे यश नंतर टिकवणे खूप अवघड जाते आणि त्यातून न्यूनगंड, निराशा. समाजाबद्दलची एक उगीचच चीड मनामध्ये भरून राहू शकते.

या चक्रातून सुटकेचा काही मार्ग आहे का? मला वाटते आहे आणि तो म्हणजे जीवनाकडे बघण्याचा एक सकारात्मक दृष्टिकोन. असा एखादा विषय शोधून काढा की ज्यात तुम्हाला फक्त काम यशस्वी झाल्यावरच नाही, तर प्रत्यक्ष काम चालू असतानाही आनंद वाटेल; आव्हान वाटेल. मग ती एखादी शस्त्रक्रिया असो, शिकविणे असो, गणित असो किंवा माहितीचे

अन्वयार्थ लावणे असो. असे काही कलाकार असतात की त्या चित्राच्या शिल्पाच्या किंवा कवितेच्या निर्मितीमध्ये त्यांना पराकोटीचे समाधान लाभते. नंतर त्यांच्या कृतीचे कौतुक कसे होते किंवा कौतुक होत नाही, याबद्दल त्यांना काही सोयरसुतक नसते. सध्याच्या जगात याला व्यावसायिक समाधान म्हणतात की, जे पगार, प्रतिष्ठा, सुरक्षितता या सर्वांच्या पलीकडील काहीतरी असते. आपल्या आवडीच्या विषयातच आपल्या चौकस बुद्धीला आणि प्रतिभाशक्तीला वाव मिळू शकतो; म्हणून पैसा, प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या पदव्यांपेक्षा आपल्या आवडत्या विषयातील पदवी व त्यांच्या संगतीतील काम यांची निवड करा.

ज्या क्षेत्रात तुमच्यातील अनेक सुप्त गुणांच्या प्रकटीकरणाला वाव आहे आणि त्यात तुमच्या स्वतंत्र वृत्तीला व माणूसपणाला वाव आहे अशी काही क्षेत्रे मी सुचवू शकेन. शिक्षण, प्रसारमाध्यमे आणि प्रशासन (सरकारी यंत्रणा, पोलीस इत्यादी) यामध्ये चांगल्या कामात आनंद घेणाऱ्या व स्वतःच्या आवडीने येणाऱ्या माणसांची खूप गरज आहे. या क्षेत्रांसाठी तुमची पदवी कोणत्याही विषयातली चालते. तसेच तुमच्या मनातील सामाजिक जाणिवेलाही या क्षेत्रात खूप संधी मिळू शकते. शास्त्र-तंत्रज्ञान क्षेत्रामध्येही समुचित तंत्रज्ञान, ते लोकांपर्यंत पोहोचविणे आणि रोजगार निर्मिती.... या दृष्टीने स्वतःचे असे छोटे-छोटे; पण स्वतंत्र उपक्रम चालवावेत.

आयुष्याच्या वाटचालीत चाकोरी-पैसा-प्रतिष्ठा यापेक्षा नाविन्य-आवडते कार्यक्षेत्र-मित्रपरिवार यांची साथ जास्त विश्वासार्ह व मोलाची, समाधानकारक असणार हे समजून निर्णय घेऊया.

प्रश्न : 1.A) खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा. (3x1=3)

I] अभ्यासक्रम निवडतांना स्वत:ची क्षमता, आणि विद्यापीठाचे शिक्षण यांची संगत जमली नाही तर ......

a) आनंद होईल
b) जीवनात यश मिळेल
c) पदोपदी ठेचा लागतील
d) नोकरी व व्यवसायात यश मिळेल

II] कोणत्या क्षेत्रासाठी कुठल्याही विषयातील पदवी चालते ?

a) वैद्यकीय
b) अभियांत्रिकी
c) सरकारी यंत्रणा व पोलीस
d) वैज्ञानिक

III] ‘पारंगत’ या शब्दाचा समानार्थी शब्द आहे ...

a) परंपरा
b) निष्णात
c) अभ्यास
d) पदवी

प्रश्न 1.B) पुढील प्रश्नांची 15 / 20 शब्दांत उत्तरे लिहा. **(2X2=4)**

I] अभ्यासाची कोणकोणती क्षेत्रे लेखकाने सुचविलेली आहेत ?

II] अभ्यासक्रम निवडीच्या गोंधळाच्या चक्रातून सुटण्यासाठी लेखकाने कोणता मार्ग सांगितला?

प्रश्न 1.C) पुढील प्रश्नाचे उत्तर सुमारे 40 / 45 शब्दांत लिहा. **(1x3=3)**

I] विद्याशाखा निवडतांना होणारा गोंधळ लेखकाने कसा मांडला आहे ?

प्रश्न 2 : खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा. (CBQ)

बाळ, चाललास रणा
घरा बांधिते तोरण
पंचप्राणांच्या ज्योतींनी
तुज करिते औक्षण.
याच विक्रमी बाहूंनी
स्वतंत्रता राखायची,
खांद्यावरी या विसावे
शांती उद्याच्या जगाची.
म्हणूनिया माझ्या डोळा
नाही थेंबही दु:खाचा;
मीही महाराष्ट्रकन्या
धर्म जाणते वीराचा.
नाही एकहि हुंदका
मुखावाटे काढणार.
मीच लावुनि ठेविली
तुझ्या तलवारीला धार.
अशुभाची साऊलीही
नाही पडणार येथे;
अरे मीही सांगते ना
जिजा-लक्ष्मिशी नाते.
तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना
शक्ती देईल भवानी,
शिवरायांचे स्वरूप
आठवावे रणांगणी.
धन्य करी माझी कूस
येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने
दूधभात भरवीन!

- पद्मा गोळे

प्रश्न 2.A) खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्याया मधून निवडून लिहा. **(2X1= 2)**

I] आई बाळाचे कशाने औक्षण करते ?

a) दिव्यांनी
b) पंचप्राणांच्या ज्योतींनी
c) सोन्या-चांदींनी
d) फुलांच्या ताटाने

II] महाराष्ट्रकन्या कोणाचा धर्म जाणते?

a) वीराचा
b) मानवतेचा
c) शौर्याचा
d) महाराष्ट्राचा

प्रश्न 2.B) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. **(3x1= 3)**

I] रणांगणी कोणाचे रूप आठवावे ?

II] आई आपले नाते कोणाशी सांगते ?

III] बाळाच्या तलवारीला कोणी धार लावून ठेवली आहे ?

विभाग ब : लेखन (15) (CBQ)

प्रश्न 3. खालीलपैकी <u>कोणत्याही एका</u> विषयावर 300 ते 325 शब्दांत निबंध लिहा. (1×10=10) (<u>आवश्यकता वाटल्यास</u> दिलेल्या मुद्द्यांचा आधार घ्यावा.)

I) पर्यावरण संवर्धन काळाची गरज -

मुद्दे:-

(पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील जीवनाचा आधार.... प्रदूषण (वायू, जल, ध्वनी, माती) याचे परिणाम...... वृक्षतोड, औद्योगिकीकरण आणि वाहतूक यामुळे वाढलेले प्रदूषण....जैवविविधता, प्राणी व वन्यजीवनावर होणारा परिणाम....स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व......पर्यावरण संवर्धनासाठी उपाय - वृक्षारोपण, सार्वजनिक वाहतूक, प्लास्टिक टाळणे..इ.)

II) शेतकऱ्याचे मनोगत -

मुद्दे :-

(माझी ओळख ....मी अन्नदाता....शेती हीच माझी उपजीविका आणि अभिमान.... माझे दैनंदिन श्रम...निसर्गाशी नाते.....निसर्गावरच माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून....पिकाशी नाते....अडचणी आणि संघर्ष..... माझ्या मनातील हळहळ..... माझे समाधान.....माझी अपेक्षा इ.)

III) मोबाईल आणि युवक -

मुद्दे:-

(मोबाईलचे फायदे - संपर्क साधणे, शिक्षण, माहिती मिळवणे......त्रासदायक परिणाम - व्यसन, झोपेची समस्या, अभ्यासावर परिणाम....सोशल मीडिया आणि मानसिक आरोग्यावर परिणाम..... वेळेचे नियोजन, मर्यादित वापर.....पालक व शिक्षकांची जबाबदारी..... फायदे आणि तोटे समजून संतुलित वापर आवश्यक...इ.)

IV) पुस्तके बोलू लागली तर...

मुद्दे :-

(वाचनाचा अनोखा अनुभव...... ज्ञान मिळण्याची नवी पद्धत......चुकांवर तत्काळ मार्गदर्शन......ग्रंथालयात जादुई वातावरण....... पुस्तके आपल्याला शिकवतील,फक्त ज्ञानच नाही तर संस्कारही...... मजा आणि मैत्री......पुस्तकांचे परस्पर संवाद.....पुस्तके न वाचणाऱ्यांवर पुस्तके रागावतील........ तुटलेल्या किंवा हरवलेल्या पुस्तकांचा आक्रोश......वाचन संस्कृतीत क्रांती इ.)

प्रश्न 4. खालीलपैकी <u>कोणत्याही एका विषयावर</u> पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) (1×5=5)

तुम्ही निखिल/निकिता राजेंद्र माने, साई निवास, पंचवटी, नाशिक,422004 असून तुमच्या भागात घंटागाडी नियमित येत नसल्याकारणाने महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्याकडे तक्रार करणारे पत्र लिहा.

किंवा

वेदांत /वेदिका देशमुख, उन्नती विद्यालय, कोल्हापूर येथून ग्रंथपाल या नात्याने ग्रंथालयासाठी मराठी कथा, कादंबरी व इतर पुस्तकांची मागणी करणारे पत्र आदर्श बुक स्टोअर्स, पुणे 400011 च्या व्यवस्थापकास लिहा.

विभाग C व्याकरण (25)

प्रश्न 5. सूचनांप्रमाणे उत्तरे लिहा.

5.A) पुढील शब्दापैकी योग्य समानार्थी शब्द ओळखा. (कोणतेही तीन) (3X1=3)

I) युद्ध

a) संग्राम b) चढाई

c) मनसुबा d) पारधी

II) संसार

a) नंदन b) भ्रतार

c) भूपती d) प्रपंच

III) किमया

a) अंधार b) चमत्कार

c) वसुधा d) संकट

IV) पावसाळा

a) ऋतू b) सलील

c) वर्षा d) वसंत

5.B) योग्य पर्याय निवडून पुढील समास ओळखा. (कोणतेही 2) **(2X2=4)**

I) 'दररोज' या सामासिक शब्दांचा समास आहे

a) कर्मधारय समास b) इतरेतर द्वंद्व

c) अव्ययीभाव समास d) विभक्ती तत्पुरुष समास

II) खालील वाक्यातील अधोरेखित सामासिक शब्दाचा समास ओळखा?

प्रजा राजाज्ञा पाळत असे.

a) अव्ययीभाव समास b) कर्मधारय समास

c) विभक्ती तत्पुरुष समास d) द्वंदव समास

III) 'आईवडिल' या सामासिक शब्दांचा समास आहे.

a) कर्मधारय समास b) अव्ययीभाव समास

c) विंभक्ती तत्पुरुष समास d) द्वंदव समास

IV) 'पुरुषोत्तम' या सामासिक शब्दांचा समास आहे.

a) कर्मधारय समास b) इतरेतर द्वंद्व

c) अव्ययीभाव समास d) विभक्ती तत्पुरुष समास

5.C पुढील वाक्यांचा सूचनेनुसार प्रयोग ओळखा किंवा बदला. (कोणतेही 3) **(3X2=6)**

I) 'मुलींच्या संघाने विश्वचषक स्पर्धा जिंकली'. ..... या वाक्याचा प्रयोग आहे.

a) कर्तरी प्रयोग b) भावकर्तरी

c) भावे प्रयोग d) कर्मणी प्रयोग

II) 'शिकाऱ्याने हरीण पकडले'. (भावे प्रयोग करा)

III) 'मी शाळेतून आत्ताच घरी आलो'. या वाक्याचा प्रयोग आहे.

a) कर्तरी प्रयोग b) भावकर्तरी

c) भावेप्रयोग d) कर्मणी प्रयोग

IV) आईने मुलांना शिस्त लावली. (कर्तरी प्रयोग करा)

5.D) वाक्य प्रकार ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्य प्रकार बदला. (कोणतेही 3) **(3X2=6)**

पुढील वाक्याचा प्रकार ओळखा.

I) सर्वांनी चांगला अभ्यास करा.

II) नदीजवळ एक झाड होते..

III) अरे वा! किती सुंदर देखावा आहे. या वाक्याचे विधानार्थी वाक्य आहे.

a) व्वा! फारच सुंदर देखावा आहे..

b) देखावा काय कमी सुंदर नाही ना ?

c) व्वा! खूपच सुंदर देखावा आहे.

d) देखावा फारच सुंदर आहे.

IV) बलसंवर्धनासाठी भरपूर व्यायाम करावा. या वाक्याचे आज्ञार्थी वाक्य आहे.

a) बलसंवर्धनासाठी भरपूर व्यायाम करा.

b) बलसंवर्धनासाठी भरपूर व्यायाम करु.

c) बलसंवर्धनासाठी भरपूर व्यायाम करावा का.

d) बलसंवर्धनासाठी भरपूर व्यायाम केला पाहिजे.

5.E) पुढे काही वाक्ये दिली आहेत. त्या वाक्यात कंसात दिलेल्या वाक्प्रचारांपैकी योग्य त्या वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.(कोणतेही 3) (CBQ) (3X2=6)

(मर्दुमकी गाजवणे, विश्वासघात करणे, पारखे होणे, विसर्ग देणे, शंख करणे)

I) शेतात लपलेल्या बिबट्याला पाहून गावकऱ्यांनी **आरडाओरडा केला**.

II)शहरात राहणाऱ्या सुभाषची आजी गावाकडे राहत असल्याने सुभाष आजीच्या **प्रेमाला दुरावला.**

III) मोहनने राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत **खूप मोठा पराक्रम केला.**

IV) स्नेहलने आईशी खोटे बोलून तिचा **गळा कापला**.

विभाग : D : गद्य - पद्य पाठ आणि उपयोजित लेखन (25)

प्रश्न 6. गद्य पाठांद्वारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

6.A) योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. [कोणतेही 2] (2X1=2)

I) खरा आनंद, टिकाऊ आनंद हा ---------------------- .

a) अंतरंगातून येतो. b) बाहयरंगातून येतो.

c) मध्यरंगातून येतो. d) उच्चरंगातून येतो.

II) चाफ्यांजवळ जावं तर त्यांच्या फुलांचा एक वेगळाच मंद मंद गंध येत असतो; पण तो ----------------- मात्र नसतो.

a) गुलाबासारखा b) चाफ्यासारखा

c) मोगऱ्यासारखा d) निशिगंधासारखा

III) कारयकरमाची येळ झाली म्हनून ------------------------ .

a) भोंगा सांगत नव्हता. b) भोंगा सांगत व्हता.

c) भोंगा गजबजत व्हता. d) भोंगा ओरडत व्हता.

6:.B) पुढीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> प्रश्नांची प्रत्येकी सुमारे 35/40 शब्दांत उत्तरे लिहा. (2X2=4)

I) गुरुजींचा मुलगा वारल्यानंतर बोर्डिंगातल्या इतर मुलांच्या मनस्थितीत काय परिवर्तन घडून आले ?

II) मनाची कवाडं या शब्दसमूहाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

III) गालावरती वाहणाऱ्या अश्रूंच्या माळा एका क्षणात हिरेजडित झाल्या, या वाक्याचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

IV) संत तुकाराम महाराज यांनी वृक्षवल्लींना 'सोयरी' असे म्हटले आहे, याची तुम्हांला उमगलेली कारणे लिहा.

6:.C) पुढीलपैकी <u>कोणत्याही दोन प्रश्नांची</u> प्रत्येकी सुमारे 70 / 75 शब्दांत उत्तरे लिहा. (2X3=6)

I) अक्राळविक्राळ राक्षसाशी लेखकाने दुखऱ्या दाताची तुलना केलेली आहे, याबाबत स्वमत लिहा.

II) ब्रिगेडियर ठाकूर यांनी शहरातील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना मार्गदर्शन करण्याची विनंती लेखिकेला का केली असावी ?

III) आपण जे काम करत आहोत, जे काम करायचचं आहे, त्यात आनंद घ्यायला शिकणं हेही शक्य असतं', या विधानाबाबत सविस्तर स्वमत लिहा.

प्रश्न 7. <u>A) पद्य पाठांच्या</u> आधारे योग्य पर्याय निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.[कोणतेही 2] (2X1=2)

I) शेतातील हिरवीगार पिके म्हणजेच ----

a) कोमल पाचूंची शेते b) कोमल नीलकमलांची शेते

c) कोमल रत्नांची शेते d) कोमल वालुकांची शेते

II) कवी सुरेश भट यांना -------------- लळा लागला आहे.

a) सुखाचा b) प्रेमाचा c) दु:खाचा d) आनंदाचा

III) सत्त्व उतारा देऊन, म्हणजे ....

a) जीवनसत्त्व देऊन　　　　b) सत्त्वगुणांचा आश्रय घेऊन

c) सात्त्विक आहार देऊन　　　　d) सत्त्वाचे महत्त्व सांगून

7. B) कोणत्याही दोन प्रश्नांची सुमारे 35/40 शब्दांत उत्तर लिहा. (2X2=4)

I) 'आरशाबाहेरील स्त्रीशी आरशातील स्त्रीने केलेला संवाद हा स्वत:शीच केलेला सार्थ संवाद आहे', हे विधान स्पष्ट करा.

II) कवीच्या आयुष्याने त्यांची फसवणूक केलेली आहे, हे तुम्ही तुमच्या शब्दांत स्पष्ट करून लिहा.

III) शेतकरी स्त्रियांच्या कष्टमय जीवनाचे वर्णन कवितेच्या आधारे लिहा.

7. C) पुढीलपैकी <u>एका काव्यपंक्तीचा</u> भावार्थ सुमारे 70/75 शब्दांत लिहा. (CBQ) (1X4=4)

आश्लेषांच्या तुषारस्नानी । भिउन पिसोळी थव्याथव्यांनी ॥
रत्नकळा उधळित माध्यान्हीं । न्हाणोत इंद्रवर्णांत वना ॥

किंवा

मनुष्य इंगळी अति दारुण । मज नांगा मारिला तिने ।

सर्वांगी वेदना जाण । त्या इंगळीची ॥

प्रश्न 8. पुढील प्रश्नाचे 60/65 शब्दांत उत्तर लिहा. (1X3=3)

व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाची ओळख करून घेण्यासाठी मुलाखत हे उत्तम साधन आहे, स्पष्ट करा.

किंवा

माहितीपत्रकाची गरज असणारी क्षेत्रे लिहून, माहितीपत्रक म्हणजे अप्रत्यक्षपणे जाहिरातच हे कसे सिद्ध करता येईल ते लिहा.

****